मा. जिल्हाधिकारी वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली दि. २/११/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त

अ.क्र.	**उपस्थित अधिकारी/पदाधिकारी**	**हुददा व कार्यालय/विभाग**
१.	मा.श्री उदय राठोड	जिल्हाधिकारी, वाशिम	अध्यक्ष
२.	श्री ए.एन.चौधरी	प्रादेशिक अधिकारी,	सदस्य
३.	श्री एस.एल.पानझाडे	मुख्याधिकारी, नगर परिषद	-
३.	श्री एम टी नगरारे,	उप अभियंता म.औ.वि.म. अकोला	सदस्य
४.	श्री संदीप सोनवणे	महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,अमरावती	सदस्य
५.	श्री बहुरुपे	क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, अकोला	-
६.	श्री पी.डी.चेचरे	व्यवस्थापक, जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, वाशिम,	सदस्य
७.	प्रतिनिधी	महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, वाशिम	-
६.	श्री एस.बी.श्रीवास्तव	महाव्यवस्थापक, जिउके वाशिम	सदस्यसचिव

सर्वप्रथम महाव्यवस्थापक जि.उ.के. वाशिम यांनी सर्व उपस्थित सभासदांचे मा.अध्यक्षमहोदयांचे वतीने स्वागत केले व मा.अध्यक्षमहोदयांचे परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्र १- वाशिम जिल्हयात उद्योगास चालना देण्याचे दृष्टीने जिल्हयातील एमआयडीसी चाआढावा घेणे-

सभेमध्ये मा.अध्यक्षांनी वाशिम जिल्हयातील सर्व औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला. क्षेत्रीय अधिकारी, मऔविम यांनी जिल्हयातील वाशिम औद्योगिक क्षेत्रात २१५.७१ हेक्टर आर इतकी जमीन महामंडळाने अधिग्रहीत केलेली असून त्यात प्रादेशिक अधिकारी यांचे क्षेत्रातील वाटप करण्याजोगे २५ भुखंड व क्षेत्र व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचे अधिकार क्षेत्रात वाटप करण्याजोगे ७२ भुखंड असे एकुण ९७ भुखंड वाटपाजोगे असल्याचे सांगुन त्यापैकी तत्कालीन प्रभारी क्षेत्र व्यवस्थापक श्री घुसे यांनी ३६ भुखंड आवंटीत केल्याचे सांगीतले. सद्यस्थितीत जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकार क्षेत्रात ३७ भुखंड आज रोजी वाटपाकरीता उपलब्ध असून प्रादेशिक अधिकारी यांचे क्षेत्रातील २० भुखंड आजरोजी वाटपास उपलब्ध असल्याचे सभेत सांगीतले.

तसेच मंगरुळपीर येथे ३५ भुखंडापैकी २९ भुखंड तत्कालीन प्रभारी क्षेत्र व्यवस्थापक एमआयडीसी यांनी अनाधिकृतपणे आवंटीत केल्याचे सांगुन जिल्हा उद्योग कंद्राचे क्षेत्रात ६ भुखंड वाटपाकरीता उपलब्ध असल्याचे सांगीतले.

रिसोड तालुक्यात ११.३५ हेक्टर आर जमीन ताब्यात घेतली असून त्यावर अतिक्रमण करण्यात आल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सभेत सांगीतले.

मालेगाव तालुक्यात २०.८० हे आर जमीन संपादन केली असून त्यापैकी १ भुखंड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वाटप करण्यात आल्याचे सांगीतले.

मानोरा तालुक्यांत १५ हेक्टर जागा ताब्यांत घेतल्याचे व ३ प्लॉट वाटप करण्यात आल्याचे सभेत सांगण्यांत आले.

मंगरुळपीर तालुक्यांत ३५ प्लॉटपैकी ३४ प्लॉट वाटप करण्यांत आले. यामध्येसुध्दा अनधिकृत वाटप झालेल्या प्लॉटची चौकशी करुन मागणी नुसार प्लॉट वाटपाचे काम एका महिन्याचे आंत सुरु करा असे आदेश देण्यांत आले.

कारंजा येथे एमआयडीसी सुरु करण्याबाबत अध्यक्षांनी सभेत विचारले असता मऔविम अधिका-यांनी मुख्यालयाची परवानगी घेण्यात येवून नव्याने जमीन संपादन करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.

विषय क्र २- दिनांक १०.५.२०१० रोजी जिउमि समितीमध्ये झालेल्या चर्चेवर केलेल्या कार्यवाहीचा वाढावा घेणे-

महाबीजचे प्रतिनिधी यांनी लोडशेडींगमुळे विज पुरवठा मिळत नसून पाणि पुरवठा होत नसल्याचे सांगीतले त्यावर मऔविम चे अधिका-यांनी महाबीजने सर्व्हीस चार्जेस व डेव्हलपमेंट चार्जेस भरला नसल्याचे सांगीतले त्यावर मा. अध्यक्षांनी महाबीज ला पत्र देण्यात येवून त्याची कॉपी जिल्हा उद्योग केंद्रास देण्याचे निर्देश मऔविम अधिका-यांना दिले.

विषय क्र ३- स्थानिक लोकांना रोजगार मुददयावर चर्चा करणे-

लघु, मध्यम व मोठया उद्योगामध्ये जास्तीत जास्त लोकांना म्हणजे ८० टक्के लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण असल्याने सर्व उद्योगामध्ये ८० स्थानिक लोकांना घेण्यात आले आहे काय१ अशी विचारणा मा.अध्यक्षांनी सभेत केल्यानंतर महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र वाशिम यांनी खालीलप्रमाणे माहिती सभेत सादर केली.

	उद्योग	गुंतवणूक	रोजगार
लघु उद्योग	३५२	३४.९२	९८ टक्के
मध्यम व मोठे उद्योग	१२३	१२३.००	८३ टक्के

विषय क्र ४- अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा-

वेळेवर येणारे विषयावर श्री चेचर व्यवस्थापक, खादी ग्रामोद्योग मंडळ वाशिम यांनी एमआयडीसी मालेगाव येथे भुखंड मिळण्याबाबत विनंती केली तसेच अमाणी येथे बिबा उद्योग व सी.एफ.सी. (Comman Facility Center) करीता जागेची मागणी केली त्यावर मऔविम यांनी जागा देण्याचे मान्य केले.

तसेच बिबा उद्योगामध्ये मजुरांना हाताने बिबा फोडावा लागत असल्याने आरोग्याचे दृष्टीने घातक असल्याचे सांगुन मशीनचे सहायाने बिबे फोडल्यास आरोग्यावर विपरीत परिणाम होणार नसल्याचे सांगीतले त्यावर खादीग्रामोद्योग मंडळाचे व्यवस्थापक यांनी दिवाळीनंतर सदर मशीनचे प्रदर्शन ठेवण्याचे मान्य केले.

शेवटी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेची सांगता करण्यात आली.

स्वा/-
महाव्यवस्थापक तथा
सदस्यसचिव, जिउमि समिती, वाशिम

स्वा/-
मा. जिल्हाधिकारी
जिल्हा उद्योग मित्र समिती, वाशिम